दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १८ मे २०२५ | अंक १५६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



रागाच्या भरात चुकीचे बोलू नका; मनः स्थिती सुधारेल, पण उच्चारलेले शब्द परत येत नाहीत.

पाकिस्तान ने ज्योती-देवेंद्रला कसं बनवलं हेर ? देशात आणखी किती गद्दार ?

हिसार येथील ट्रॅव्हल व्लॉगर आणि युट्यूबर ज्योती मल्होत्रा आणि कैथलमधील मस्तगढ गावातील देवेंद्र सिंग (25) यांनी पाकिस्तानला गुप्त माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली हरियाणा आणि पंजाब पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. भारतात राहूनच पाकसाठी हेरगिरी करणाऱ्या या लोकांचा पर्दाफाश झाला असून या घटनेमुळे प्रचंड खळबळ माजली आहे. यूट्यूबर ज्योतीला पाच दिवसांच्या पोलिस कोठडीत पाठवण्यात आले आहे. हे प्रकरण देशभरात चर्चेचा आणि चिंतेचा विषय बनले आहे. मात्र या दोघांचा भपरखा टला असला तरी देशात असे आणखी किती देशद्रोही आहेत? हा प्रश्न आता उपस्थित होतोय.हरियाणा आणि पंजाब पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या लोकांवर काही पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या संपर्कात असल्याचा आणि त्यांच्याशी संवेदनशील माहिती शेअर केल्याचा आरोप आहे.

ट्रॅव्हल ब्लॉगर आणि युट्यूबर ज्योती मल्होत्राला शनिवारी हिसारमधील सिव्हिल लाइन्स पोलिसांनी पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक केली, अशी माहिती सूत्रांनी दिली. ती पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात होती आणि व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि स्नॅपचॅट सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करून संवेदनशील माहिती शेअर करत होती असे हरियाणा पोलिसांनी एफआयआरमध्ये म्हटले आहे.

पाकिस्तानसह अनेक देशांची केली यात्रा

ज्योती मल्होत्रा ही ट्रॅव्हल-विथ-जो नावाचे एक यूट्यूब चॅनल चालवते. ज्योतीने पाकिस्तानसह अनेक देशांचा प्रवास केला होता आणि सोशल मीडियावर पाकिस्तानची सकारात्मक प्रतिमा सादर करण्याचे काम तिच्यावर सोपवण्यात आले होते. 2023 साली ती पाकिस्तानला भेट देणाऱ्या धार्मिक शिष्टमंडळाचा भाग होती असे चौकशीदरम्यान तिने पोलिसांना सांगितले.

यूट्यूबर आणि ब्लॉगर ज्योती मल्होत्राला अटक

खरतर, प्रसिद्ध युट्यूबर आणि ब्लॉगर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. भारतीय गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनंतर हरियाणा पोलिसांनी ज्योती मल्होत्राला अटक केली. पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि पाकिस्तान दूतावासातील कर्मचारी दानिश यांच्या सांगण्यावरून भारताविरुद्ध हेरगिरी केल्याचा आरोप ज्योती मल्होत्रावर आहे.

सर्व परळीकरांच्या वतीने निवेदनाद्वारे सोमवार दिनांक १९ मे २०२५ रोजी शिवराज दिवटे याला झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ परळी बंद

परळी (वार्ताहर) परळी तालुक्यातील लिंबूटा गावचा तरुण शिवराज नारायण दिवटे याला झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ सोमवार दिनांक 19 मे 2025 रोजी परळीकरांच्या वतीने परळी बंदच आव्हान करण्यात आले असून या बंदमध्ये सर्वांनी सहभागी होऊन या घटनेचा निषेध करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

परळी शहर व तालुक्यात वारंवार मारहाणीच्या घटना घडत असून याला कुठेतरी चाप बसवणं गरजेचे आहे मागील काही महिन्यापासून परळी मध्ये गुंडागर्दी दादागिरी दहशत खूप वाढलेली आहे हे टोळ्या बनवून अनेक प्रकारच्या घटना घडवत आहेत या टोळ्यांमध्ये 12 वर्षापासून 25 वर्षांपर्यंतचे नवतरुण वर्ग व्यसनाधीनतेच्या आहारी जात आहेत व या तरुणांच्या पाठीमागे परळी मध्ये अनेक कुटाणे करून वाम मार्गाने अमाप संपत्ती कमवलेले बलाढ्य श्रीमंत लोक असून त्यांचं अस्तित्व गुंडागर्दी दहशतवाद करून आबादी ठेवण्यासाठी तरुणांचा वापर करत आहेत आज दिलेल्या निवेदनामध्ये पुढील प्रमाणे मागण्या केल्या आहेत नंबर 1) शिवराज नारायण दिवटे या तरुणाला मारहाण केलेल्या गुंडाची संघटित गुन्हेगारी मोकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी नंबर 2) परळी मध्ये कायदा सुव्यवस्था पूर्णपणे ढासळला असून मारहाणीच्या वारंवार घटना घडत आहेत या घटनांना आळा घालण्यात यावा नंबर 3) या प्रकरणाच्या निषेधार्थ सोमवार दिनांक 19 मे 2025 रोजी परळी शहर बंद करण्यात येत आहे नंबर 4) या प्रकरणांमध्ये आरोपीवर कठोर कारवाई नाही झाली तर व्यापक जण आंदोलन करण्यात येईल नंबर 5) महत्त्वाचे या प्रकरणांमध्ये जे आरोपी आहेत त्यांची परळी शहरातून धिंड काढण्यात यावी या मागणीचे निवेदन शनिवार 17 मे 2025 रोजी शहर व संभाजीनगर पोलीस स्टेशनला परळीकरांच्या वतीने देण्यात आले आहे. तसेच यामध्ये सर्व व्यापारी सर्वपक्षीय नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

धनंजय देशमुख परळीतील 'त्या' तरुणाच्या भेटीला

परळीमध्ये दहा ते बारा जणांच्या एका टोळक्याने शिवराज दिवटे नावाच्या एका तरुणाला बेदम मारहाण केली आहे. लाठ्या-काठ्याने ही मारहाण झाली आहे. विशेष म्हणजे या अमानुष मारहाणीचा एक व्हिडीओही सध्या व्हायरल झाल्याने या प्रकरणाची राज्यभरात चर्चा होत आहे. काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे, असा दावा केला जात होता. असे असतानाच आता मारहाणीचे हे प्रकरण समोर आले आहे. दरम्यान, आता मारहाणीत जखमी झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाच्या भेटीला धनंजय देशमुख गेले आहे. त्यांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली असून लवकरच बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. कठोर शासन करणे गरजेचेधनंजय देशमुख हे बीडचे दिवगंत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू आहेत. संतोष देशमुख यांची काही महिन्यांपूर्वी निर्घृण हत्या झाली होती. या हत्येनंतर राज्यभरात खळबळ उडाली होती. "मी उद्या किंवा परवा दिवशी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेणार आहे. परळी तालुक्यातील लिंबुटा गावातील युवक शिवराज दिवटे यास दहा ते बारा युवकांनी परळी तालुक्यातील टोकवाडी शिवारात घेऊन मारहाण करण्यात आली होती. त्याचा व्हिडिओदेखील व्हायरल करण्यात आला होता.

वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना नांदेड जिल्ह्यासाठी १७,१८,२० व २१ मे या चार दिवसासाठी येलो अलर्ट

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी १७ मे रोजी दुपारी १ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १७,१८, २० व २१ मे या चार दिवसासाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. हे चार दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्ह्ला प्रशासनाकडून करण्यात आले आहे.या गोष्टी करा :- विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. या गोष्टी करु नका :- आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिह्ला प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

डोक्यावर बंदूक असताना राऊतांना: साकेत गोखलेंच्या भाषणाची चर्चा!

मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात खासदार संजय राऊत यांचे नरकातला स्वर्ग या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाला खासदार शरद पवार, प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, लेखक शरद तांदळे तसेच पश्चिम बंगालचे खासदार साकेत गोखले उपस्थित होते. या कार्यक्रमात गोखले यांनी केलेल्या भाषणाची सध्या चांगीलच चर्चा होत आहे. जेल हा नरक असतो साकेत गोखले यांनीदेखील राऊतांप्रमाणेच साधारम नऊ महिने तुरुंगवास भोगलेला आहे. त्यामुळे त्यांनी राऊतांच्या या पुस्तकाचे तोंडभरून कौतुक केले. जेल हा नरक असतो. बॉलिवूडमध्ये दाखवलं जातं की राजकीय व्यक्ती आत गेला तर एसी वगैरे मिळतो. पण विरोधक जर आत गेला तर त्याला वाईटातील वाईट वागणूक दिली जाते. कारण त्याला मोडायचं असतं, असं मत गोखलेंनी व्यक्त केलं. 500 रुपये नव्हते म्हणून... तसेच, तुम्हाला जामीन मिळेल. सेटलमेंट करा, अशी ऑफर देण्यात आली होती. एक व्यक्ती पाच वर्षापासून आत होता. त्याने ३५ रुपयाची दुधाची पिशवी चोरली होती. पण 500 रुपये जामीन भरायला नव्हते म्हणून तो आतमध्ये राहिला. तो मला म्हणाला, आईच्या पोटातही बाळ नऊ महिन्यापेक्षा जास्त राहू शकत नाही. तर आपण काय राहणार. तुम्ही लढत राह, अशी आठवण गोखले यांनी सांगितली.

न्याय व्यवस्था ही आदर्श असायला हवी, ती ईडीच्या हातात जायला नको - शरद पवार

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्या 'नरकातला स्वर्ग' पुस्तकाचे प्रकाशन आज राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या हस्ते मोठ्या दिमाखदार सोहळ्यात झाले. लोकशाहीचा अभ्यास करणारे, लोकशाहीवर प्रेम करणारे आणि लोकप्रतिनिधींना या 'नरकातील स्वर्ग' या पुस्तकातून शिकायला मिळेल की सत्तेचा गैरवापर कसा केला जातो आणि त्याविरोधात लढायचे कसे याचा उत्तम पाठ यात आहे असेही शरद पवार यावेळी म्हणाले. ते तत्पूर्वी आपल्या भाषणात पवार म्हणाले की लक्षात राहणारा असा आजचा कार्यक्रम आहे. संजय राऊत यांनी १०० दिवस तुरुंगात घालवले. तिथले सर्व अनुभव लिखित स्वरुपात आपल्यासमोर मांडले. कुणी गुन्हा केला असेल, केस झाली असेल, निकाल लागला असेल असं संकट काही लोकांवर येत असतं. पण संजय राऊत यांनी काय केलं होतं? संजय राऊत नियमित रोखठोक भूमिका मांडली. हे काही लोकांना मान्य नव्हतं. त्यांची ही लेखणी काही लोकांना पचत नव्हती. ते अस्वस्थ होते. बहुतेक संधीची वाटच पाहत होते. त्यांना संधी दिली पत्राचाळ प्रकरणाने दिली. पत्राचाळीत कष्ट करणारे मध्यमवर्गीय लोक राहत होते. यांचं योगदान या प्रकरणात अधिक आहे. ईडीने जी केस केली. त्यात राऊता यांचा काहीही संबंध नसताना त्यांना गुंतवण्याचं काम केलं. जिथे अन्याय होतो, अत्याचार आहे, त्याच्या विरोधात सामना उभा राहतो. हे अखंडपणे काम सुरू होतं असेही शरद पवार यावेळी म्हणाले. शासकीय यंत्रणेत



जिथे भ्रष्टाचार आहे. त्याविरोधात ते नेहमी लिहितात. मुंबई आणि महाराष्ट्रात काही लोक चुकीचं काम करतात हे माहीत असताना त्यांच्यासंबंधीची कारवाई होत नव्हती. संजय राऊतांनी खासदार म्हणून देशाच्या प्रमुखांना याबाबतचं पत्र लिहिलं. जे लोक शासकीय यंत्रणा यांच्याशी भ्रष्टाचाराच्या मार्गाने संबंध ठेवतात अशा लोकांच्या मार्फत पैसे कसे गोळा केले जातात याचं सविस्तर लिखाण त्यांनी केंद्राला कळवलं. त्यात जवळपास ३० ते ३५ असे लोक आणि कंपन्या अशा होत्या की ज्यांच्याकडून पैसे काढले गेले. ही रक्कम ५८ कोटीच्या आसपास होती. ही माहिती राऊत यांच्याकडे आल्यावर त्यांनी देशाच्या प्रमुख लोकांना लिखीत स्वरुपात ती पाठवून दिली. पण, कारवाई झाली नाही असे शरद पवार यांनी यावेळी सांगितले. संजय राऊत यांना १०० दिवस तुरुंगात राहावं लागलं. त्यांनी पुस्तक लिहिलं. हे वाचल्यावर तिथली स्थिती काय आहे हे आम्हाला कळेल. ही स्थिती दुरुस्त करण्याचा प्रयोग करावा लागेल. त्यांच्या जेलमधील आठवणी आणि अनेकांच्या भेटीगाठी हा लक्षात येणार आहे. एकनाथ खडसे आमचे सहकारी आहे. त्यांचे जावई इंग्लंडमध्ये होते. टाटा कन्स्ल्टन्सीत मोठ्या पदावर होते. खडसेंवर कारवाई झाली. त्यांना त्रास होईल हे कळलं. तेव्हा सासऱ्यासाठी ते लंडनहून आले. त्यांचा संबंध नसताना ईडीने त्यांना अटक केली आणि तुरुंगात टाकलं असे पवार यावेळी म्हणाले. न्याय व्यवस्था ही आदर्श असायला हवी संजय राऊत यांच्या पुस्तकाचे हिंदी आणि इंग्रजीत अनुवाद यावेत, लोकशाहीचा अभ्यास करणारे, लोकप्रतिनिधी यांतून माहीती मिळेल. सत्ताधाऱ्यांविरोधात लढण्याचे बळ मिळेल, न्याय व्यवस्था ही आदर्श असायला हवी, ती ईडीच्या हातातील बटीक व्हायला नको याचा धडा यातून मिळेल असेही शरद पवार यावेळी म्हणाले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १८ मे २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

27 वर्षांनंतर मिळाले तिला तिचे हरवलेले हक्काचे घर

घर एक आनंद, सुरक्षेचे आध्यात्मिक स्थान. नातेवाईकांकडून मिळणारे प्रोत्साहन, आई-वडिलांकडून मिळणारे निस्वार्थी प्रेम भावंडाकडून मिळणारी माया आणि लुटुपुटूची भांडणे सर्वांना हवेहवेसे वाटणारे हक्काचे स्वर्गाचे दार म्हणजेच घर. घर ही केवळ एक जागा नाही तर त्यात आपुलकीची भावना आहे ज्यात मार्गदर्शन,सौख्य, प्रेम, समर्पण, एकता उत्साहाचा संगम घडून येतो.पण काहींच्या नशीबी मात्र यापासून खूप काळ दूर होणे येते पण त्याची त्या निरागस मनाला जाणीव देखील होत नाही.होय! अशीच एक मनोरुग्ण... मनोरुग्ण म्हणून समाजात ज्यांना हिणवले जाते त्यांच्या मनाचा, त्यांना वाटणाऱ्या भावनांचा विचार केला जात नाही. खरेतर जसा शरीराला आजार जडतो तसाच हा मनाला जडणारा आजार जो योग्य औषधोपचार,समुपदेशन आणि मायेच्या माणसांच्या सानिध्याने त्यांच्या प्रेमाने बरा होतो. पण यावर अजूनही हवी तेवढी जनजागृती झाली नाही. तर अशीच एक मनोरुग्ण मुसम्मा नॉट known 27 वर्षापुर्वी ही आर्थर रोड जेल मधुन अंडर ट्रायल म्हणून माननीय न्यायाधीश विक्रोळी कोर्ट यांच्या आदेशाने जेल प्रशासनामार्फत मनोरुग्णालयात उपचारासाठी दाखल झाली. Mlc मनोरुग्ण म्हणून तिच्यावर उपचार सुरू झाले. मनोरुग्णालयातील ह्या 27 वर्षांच्या वास्तव्यादरम्यान मुसम्मा फक्त लहान मुलासारखी बोलायची दर वेळेस दर 3 महिन्यांनी माननीय कोर्ट कमिटी समोर सातत्याने तिला चर्चेसाठी उपस्थित करावे लागायचे परंतु प्रत्येक वेळेस मुसम्मा ह्या रुग्णाने स्वतः बदल काहीही माहीती दिली नाही. बंगाली दुभाषी आणून त्यांच्याशी तिचे बोलणे करून दिले परंतु त्या काहीही माहीती देत नव्हत्या सातत्याने लहान मुलासारखे हसणे आलेल्या प्रत्येक व्यक्तिच्या पाया पडणे हे त्यांना फार आवडायचे.अगदी दोन ते तीन व्यक्तींना एखादा पदार्थ वाढल्याशिवाय त्या काहीही खात नव्हत्या असा त्यांचा दिनक्रम असे. प्रत्येक वेळेस त्यांचा संवाद लहान मुलासारखा असायचा त्यामुळे माननीय न्यायालय कमिटीच्या पात्रता फेरीतून त्यांना unfit for discharge व unfit फॉर ट्रायल असाच कमिटीचा शेरा मिळायचा. रुग्णालय प्रशासनाने सलग 7 वर्षे वरील मुसम्मा चा stay असल्यामुळे सतत 2010 पासून पत्रव्यवहार करून शासनाला तिच्यावरील गुन्ह्याचे कलम काढून तीला साधारण रुग्ण घोषित करावेत असा पाठपुरावा घेतला.सततच्या प्रयत्नांना यश आले...न्यायालयीन आदेशान्वये मुसम्मा या सिव्हील रुग्ण म्हणून घोषित झाल्या जणू अर्धी लढाई जिंकली होती आणि अर्धी बाकी होती पण त्यासाठी देखील लवकरच प्रयत्न सुरू झाले.

समाजसेवा अधीक्षक श्रीमती रंजना दोनोडे , मानसोपचारतज्ज्ञ डॉ.अमोल भुसारे, व मानसोपचार सिस्टर श्रीमती सोनाली पंडित डॉ श्वेता राठोड,कक्ष परिसेविका श्रीमती वर्षा फटकाळे वराडे अधिपरिचरिका देशमाने,तटकरे,कुंभार,पाटील तसेच इंटर्न स्टुडंट आणि बंगाली भाषा बोलणाऱ्या psychology student आभाग्या दास यांच्यासोबत मनोरुग्ण मुसम्मा सतत संवाद साधत होती आणि लहान मुलांसारखी उत्तरे देत होती.हळू हळू तिने तिचे शाहपुर गाव आसाम सांगितले शाहपुर हे 3 गाव वेगवेगळ्या ठिकाणी जसे नल्बारी कोकराझार अमीनकाटा आसाम असे गूगल वर आढळले. सातत्याने याचा पाठपुरावा घेतला गेला. तसेच बऱ्याच वेळा स्टुडंट अभाग्या दास व मुसम्मा यांचे बंगाली भाषेत संवाद साधले गेले. अनेकवेळा माहिती विचारली की, कधी तुटक शब्दात बंधू डॉक्टर आहेत अशी माहिती मिळायची. मुसम्मा च्या हक्काच्या घराचा शोध सुरू झाला. कोकराझार पोलिस हेड कंट्रोल sp office संपर्कप्रमुख कोकराझार पोलिस मोबाईल नंबर 6026900824 watsapp वर मुसम्माचे फोटो व सर्व माहिती दिली मुसम्माचे ड्यूटी वर कार्यरत असणाऱ्या पोलिसांसोबत बोलणे करून दिले परंतु फोन वर ती नुसतीच लहान मुलासारखी हसत होती तिने पोलिसाना काहीच उत्तर दिले नाही पुन्हा दुसरा प्रयत्न असामी बेलसॉर पोलिस इंस्पेक्टर श्री नीलमनी नाथ याना तिचे फोटो व डिटेल्स शेअर केले .त्याच्या अधिपत्याखाली रुग्ण सांगत असलेले शाहपुर गाव येत होते परंतु 27 वर्षापासुन बेपत्ता असलेल्या तसेच हुबेहूब वर्णन असलेल्या अशा मुसम्मा नावाने किंवा ईतर मुस्लीम महिले बाबत खात्रीची माहिती भेटली नाही. त्यानंतर श्रद्धा टीमची यासाठी मदत घेतली त्यांचे नेटवर्क खूप विस्तृत आहे त्यांच्या मदतीने ती सांगत असलेले संदर्भ श्रद्धा टीमला मिळाले व श्री वाटवाणी सर श्रद्धा रिहॅब टीम यांनी मेल पाठवले. तिच्या नातेवाईकांना तिच्याविषयी समजताच त्यांचे आनंदाश्रु वाहू लागले एवढ्या वर्षांनी कधी तिला मन भरून पाहू असे त्यांना झाले होते. तिला आसाम मधील नातेवाईकाच्या ओळखपरेड करिता श्रद्धा रिहॅब येथे पाठवावे असे ठरले त्यानुसार मनोरुग्ण मुसम्मा जी शाहीन बेगम या नावाने ट्रेस झाली ती आज दिनांक 29 एप्रिल 2025 ला श्रद्धा रिहॅब होम यांच्या सुपूर्त करण्यात आली आहे. ह्या सर्व कामामध्ये मनोरुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर नेताजी मुळीक सर DS आळसपूरकर मॅडम तसेच प्रभारी मेट्रन कांबळे, असिस्टंट मेट्रन मोरे,संख्ये यांचे मार्गदर्शन लाभले

सौ वर्षा फटकाळे वराडे
परिसेविका प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे

वाचकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारी बालकादंबरी सावी

लेखिका नसीम जमादार कोल्हापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध बालसाहित्यिका आहेत. त्या पन्हाळा येथील नेबापूर न्यू हायस्कुलमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत आणि आपल्या कर्तव्याचे यशस्वी पालन करत आजवर सुमारे तीस वर्षे पूर्ण केले आहेत. या कालावधीत त्यांनी विद्यार्थ्यांसोबत सतत संपर्क ठेवत त्यांना केवळ शिक्षणाचे धडेच दिले नाहीत, तर समाजात जबाबदार नागरिक म्हणून कसे वागावे याचे संस्कारही दिले आहेत. शिक्षण केवळ शालेय अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांना भारताचे भविष्य म्हणून घडवण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षक करीत असतात.जेव्हा शिक्षक आपल्या कर्तव्याच्या जोडीने लेखणी उचलून आपल्या अनुभवांचे लेखन करू लागतो, तेव्हा ''सावी...एका संघर्षमय जीवनाची गाथा'' यांसारखी संस्कारक्षम कादंबरी आकार घेत असते.

लेखिका नसीमा जमादार यांनी ''सावी'' या बालकादंबरीतून स्वतःचा अनुभव मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. यात एक विद्यार्थी शिक्षकाच्या छोट्या छोट्या प्रोत्साहनामुळे आत्मविश्वास पुन्हा मिळवत जातो आणि पुढे जाऊन एक जबाबदार व यशस्वी नागरिक म्हणून समाजात वावरतो. सोबतच तो समाजाच्या हितासाठी हातभार लावत राहतो–शिक्षकासाठी याहून मोठे समाधान काय असू शकते!लेखिका नसीम जमादार यांनी लिहिलेल्या ''सावी'' या कादंबरीचा सारांश असाच आहे. या कादंबरीत लेखिका सहाय्यक नायिकेच्या भूमिकेत दिसतात, आणि मुख्य भूमिकेत सावी ही हाताश, आत्मविश्वास हरवलेली, मागच्या बाकावर बसणारी विद्यार्थिनी आहे. ही कथा सावीच्या जीवनप्रवासाची नसून तिच्या शालेय प्रवासाची आहे–हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवण्याचा आणि त्यानंतर तिच्या बदललेल्या स्वरूपाचा. लेखिकेने आपल्या ओघवत्या भाषाशैलीद्वारे विविध प्रसंगांचे प्रभावी चित्रण करत हा प्रवास वाचकांसमोर उलगडला आहे.या कादंबरीच्या मुखपृष्ठावर एक विद्यार्थिनी आपल्या शाळेसमोर हातात पुस्तकं घेऊन उभी आहे, असे चित्रकार यशवंत पेंटर यांनी रेखाटले आहे. तसेच, कादंबरीतील



विविध प्रसंगांनुसार चित्रकार अजय ढवळे यांनी आतील चित्रे साकारली आहेत. या कादंबरीसाठी ज्येष्ठ साहित्यिक माधव राजगुरू यांनी सारगर्भ प्रस्तावना लिहिली असून, ज्ञानपीठ बालसाहित्य पुरस्कारप्राप्त साहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी कादंबरीला पाठराखण केली आहे.

सावी ही अशी विद्यार्थिनी आहे जी आठवीपर्यंत पोहोचली असली तरी घरच्या जबाबदारीमुळे तिचे अभ्यासाकडे आणि स्वतःकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. त्यामुळे तिचे स्वतःचे नाव व्यवस्थित उच्चारणे आणि लिहिणे जमत नव्हते, तसेच कपडे आणि केस नीटनेटके ठेवणेही तिला कठीण वाटत होते. तिचे आई-वडील शेतीच्या कामात व्यस्त असल्याने घरची आणि भावाची संपूर्ण जबाबदारी सावीवरच होती. या जबाबदारीच्या ओझ्याखाली तिचा आत्मविश्वास हरवला होता. जेव्हा शिक्षिकेची सावीशी पहिली भेट होते, तेव्हा शिक्षिका सावीचा अवतार पाहून चकित होतात. हे चित्र शिक्षिकेच्या मनातील मातृत्वाला साद घालते, आणि त्याच क्षणी सावी व शिक्षिकेचा एका नव्या प्रकाशाकडे प्रवास सुरू होतो. या कादंबरीतील प्रसंग सत्य घटनांवर आधारित आहेत, तसेच लेखिकेचा स्वतःचा अनुभवही त्यात प्रतिबिंबित होतो, हे लेखिका नसीमा जमादार यांच्या मनोगतामधून स्पष्ट होते. लेखिकेने प्रत्येक प्रसंग सहज आणि जिवंत चित्रणासह लिहिला आहे, त्यामुळे वाचक आणि विद्यार्थी दोघेही ही कादंबरी एका दमात वाचण्याचा मोह टाळू शकत नाहीत.

माधव राजगुरू यांनी प्रस्तावनेत असे नमूद केले आहे की, सावी तिच्या लग्नापर्यंत मुलांच्या आवडीची असेल, परंतु लग्नानंतर तिला शाळेतील शिक्षकांनी दिलेल्या सामाजिक शिक्षणाच्या मदतीने स्वतःच्या स्वबळावर गरुडझेप घ्यायला मिळते. लेखिकेने कादंबरीत हे प्रभावीपणे चित्रित केले आहे. हेच मुलांना त्यांच्या स्वतःच्या बळावर उभे राहण्यासाठी आत्मविश्वास किती महत्त्वाचा असतो, याची जाणीव करून देईल. एक वाचक म्हणून हे माझे मत आहे.होय, हीच या कादंबरीची खरी ताकद आहे! सावीच्या प्रवासात केवळ तिच्या शिक्षणाची वाढच होत नाही, तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही होतो. सुरुवातीला जबाबदारीच्या ओझ्याखाली दबलेली आणि आत्मविश्वास हरवलेली सावी जसा शिकत जाते, तसतसा तिच्या जगण्याचा दृष्टिकोन बदलतो. छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधण्याची तिची वृत्ती, शाळेविषयी तिचे वाढते प्रेम आणि स्वतःला स्वीकारण्याचा तिचा प्रवास–हे सारेच अत्यंत प्रेरणादायी आहे. हा बदल सहजपणे वाचकांच्या मनाला भिडतो आणि हरवलेल्या आत्मविश्वासाला पुनर्जिवीत करण्याची शक्ती शिक्षणात असते, हे अधोरेखित करतो.

''सावी... एका संघर्षमय जीवनाची गाथा'' ही कादंबरी केवळ बालवाचकांसाठी प्रेरणादायी ठरणारी नाही, तर प्रौढ वाचकांनाही अंतर्मुख करणारी आहे. तिची रेखीव मांडणी, प्रसंगांचे प्रभावी वर्णन आणि परिस्थितीनुसार असलेली चित्रमय मांडणी कादंबरीला अधिक जिवंत बनवते. विशेषतः रंगीत पानांमुळे बालवाचकांना ही कादंबरी अधिक आकर्षित करते.कथानकातील प्रत्येक प्रसंग एक नवीन शिकवण आणि जीवनाचा बोध देतो. लेखिका नसीम जमादार या संस्कारक्षम बालसाहित्यिक म्हणून नावारूपाला येत आहेत. त्यांच्या ''नो मेन्स लँड''या बाल एकांकिका संग्रहाच्या यशस्वी कामगिरीनंतर ''सावी'' ही बालकादंबरीसुद्धा बाळसाहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान निर्माण करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

आजच्या पिढीला वाचनाची गोडी निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या आहारी गेलेल्या मुलांना दर्जेदार बालसाहित्य वाचनाची प्रेरणा देण्यासाठी अशा पुस्तकांची नितांत गरज आहे. लेखिका नसीम जमादार अशाच उत्तम साहित्यनिर्मिती करत राहोत आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी मिळो, यासाठी त्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा!

परीक्षण/समीक्षण : खाजाभाई बागवान, सोलापूर
पुस्तकाचे नाव : ''सावी.. एका संघर्षमय जीवनाची गाथा''
लेखिका, कवयित्री : नसीम जमादार
प्रकाशक : संस्कृती प्रकाशन
प्रकाशन वर्ष :एप्रिल २०२४
एकूण पृष्ठसंख्या : ६४
वाङ्मय प्रकार : बालकादंबरी
मूल्य : २०० रु.

सेंट टेरेसा बॉईज वांद्रे चा निकाल ९३.९३ टक्के

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी वांद्रे मुंबई येथील सेंट टेरेसा बॉईज शाळेचा यंदाचा दहावीचा निकाल ९३.९३ टक्के इतका लागला असून वंश गुप्ता ९२.८० टक्के मार्क्स मिळवून शाळेतून पहिला आला असून सय्यद अबिद ९३.४० गुणांनी दुसरा आला.या शाळेचा गेल्या वर्षी शंभर टक्के निकाल लागलं होता.यंदा १९८ पैकी १८६ विधार्थी उत्तीर्ण झाले असून ४३ जणांचा उच्च श्रेणी ६२ जणांना फर्स्ट क्लास तर ६१ मुलांना द्वितीय श्रेणी मिळाली आहे. शाळेच्या इतिहासात याआधी शाळेचा अनेकदा १०० टक्के निकाल लागलेला असून यावेळी कुठे कमी पडलो ते आम्ही नक्कीच पाहू असे मुख्याध्यापक फादर निकी म्हणाले.शाळेतील मुल अभ्यासात आणि खेळात निपुण आहेत आणि आम्हाला त्यांचा अभिमान असल्याचे सर्व शिक्षकांनी सांगितले आहे.

कवी विजय कदम यांचा भटक्या काव्यसंग्रह प्रकाशित..

पलपब प्रकाशन संस्था, अहमदाबाद यांच्यामार्फत अजिंक्य सहित्यसंगम राज्यस्तरीय साहित्यसंमेलन आणि पुरस्कार सोहळा २०२५ घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात सामाजिक जाणिवांची कास धरणारा कवी विजय उषा शहाजी कदम यांचा ''भटक्या'' काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला. यावेळी संमेलनाध्यक्ष लेखक अनिल बोधे सर,आमचे प्रेरणास्थान ज्येष्ठ लेखक सुरेश हरिभाऊ शिंगटे,सातारा जिल्ह्याचे साहित्य क्षेत्रातील अस्सल लखलखीत सोनं आमचे मार्गदर्शक प्रदिप कांबळे सर,पुस्तकातील कवी हणमंत चांदुगडे,ज्येष्ठ लेखिका रेखा दिक्षित, पलपब प्रकाशनच्याच्या सर्वेसर्वा लीना पाटील मॅडम,पलपब महाराष्ट्र अध्यक्ष कवी किरण तोडकर आणि राज्यभरातून विविध जिल्ह्यातून आलेले साहित्यिक व साहित्य रसिक 300 हून अधिक उपस्थित होते.

समाजाच्या मनाचा आरसा दाखविणारा भटक्या कवितासंग्रहात लेका तुला खरा देवच नाही कळला, भटक्या, बाप समजायला बापाचं काळीज लागतं या कवितेतून आई बापाची महती,शेतकऱ्याची खरी व्यथा ''रास्त हमी भाव'', ''अजून नाही पाऊसाचा ठाव'', ''पाऊशा'' या कवितेतून मांडली आहे.स्त्रियांचे मोल आणि त्याच्या व्यथा विटाळ,बाई कुठे काय करतेस, माऊली या कवितेतून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. लाईफटाईम कनेक्शन,जवानी, डोसा, प्रेमांकुर आणि ''ती आणि मी'' या कवितेतून प्रेमाच्या निखळ भावना प्रकट केल्या आहेत.माझं शहर पेटतय,शिवबाची आन,म्हसोबा या कवितेतून सामाजिक संदेश देण्याचे कार्य केले आहे. अशा एकूण ४२ कविता या काव्यसंग्रहात आहेत. अशाप्रकारे विविध विषयांवर सामजिक संदेश देण्याचे कार्य यांच्या काव्यातून करण्यात आलेले आहे.युवापिढीला नव्या जाणिवा देणारा आणि समाजभान निर्माण करणारा ''भटक्या'' हा कवितासंग्रह आजच्या काळातील एक महत्त्वपूर्ण साहित्यिक दस्तऐवज ठरेल असे मत उपस्थित मान्यवरांनी या वेळी व्यक्त

केले.तसेच कवी विजय कदम यांचे गुरुवर्य आणि मार्गदर्शक दैनिक सकाळचे पत्रकार सुनिल शेडगे सर आणि पलपब प्रकाशनचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संदीप पवार सर यांनी यांनी या काव्यसंग्रहाला शुभेच्छा दिल्या.

कवी विजय कदम हे सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर या गावचे नवोदित कवी असून त्यांचे मूळ गाव कोरेगाव तालुक्यातील अपशिंगे आहे.भारतीय डाक विभागात कार्यरत असून ते माऊली करिअर अकॅडमी रहिमतपूर चे संस्थापक व संचालक आहेत. या अकॅडमी मार्फत पोलीस भरती,आर्मी भरती आणि स्टाफ सिलेक्शन भरती करणाऱ्या मुलांना मार्गदर्शन करतात. याठिकाणी अनाथ मुलांना मोफत मार्गदर्शन दिले जाते.आतापर्यंत 200 हून अधिक मुलांना मार्गदर्शन त्यांनी केले आहे.गावाकडची नाळ आणि शहराची व्यथा मांडण्याचे काम या कवितासंग्रहातून केले आहे. या कवितासंग्रहाची प्रेरणा आई वडिलांच्या संस्कारातून आणि शिकवणीतून मिळाली आहे.भावाची साथ आणि पत्नीचे प्रेम यासाठी खूप मोलाचे ठरले आहे. तसेच अपशिंगे गावचा कदम परिवार,आजोळ असलेले नहरवाडी गावचा मोहिते व कदम परिवार आणि काशिद गल्ली मित्र परिवार या मध्ये कायम सोबत राहिला आहे.

उज्जैनकर फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे घेतली विविध मान्यवरांची सदिच्छा भेट

दिनांक 12 मे 2025 रोजी शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर तालुका मुक्ताईनगर जिह्ला जळगावचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी त्याच प्रमाणे उज्जैनकर फाउंडेशनचे पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव पुणे येथील श्री रामचंद्र गुरव त्याच्या प्रमाणे ठाणे जिह्ला विधी सल्लागार ॅड प्रकाश सपकाळे यांनी उज्जैनकर फाउंडेशनचे ठाणे जिह्ला संपर्कप्रमुख श्री राजेशभाऊ उज्जैनकर यांच्या रामबाग, कल्याण येथील निवास स्थानी जाऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना आदिशक्ती संत मुक्ताईची प्रतिमा, आळंदी संमेलनाचा विशेषांक, पुस्तक व गुलाब बुके देऊन सत्कार केला. याप्रसंगी उज्जैनकर फाउंडेशनचे चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन सप्टेंबर महिन्यात कल्याण येथे घेण्याविषयी चर्चा करण्यात आली.त्याचप्रमाणे मोहना तालुका कल्याण येथील समाजसेवक श्री सुरेशभाऊ उंबरकर यांच्या निवासस्था नी सुद्धा डॉ. उज्जैनकर व श्री रामचंद्र गुरव यांनी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी श्री मधुकरशेठ बुडुखले ,श्री योगेशशेठ बुडुखले यांची उपस्थिती होती याप्रसंगी फाउंडेशनच्या कार्याचे सर्व मान्यवरांनी खूप खूप कौतुक केले.

त्याचप्रमाणे दिनांक 13 मे रोजी डॉ.शिवचरण उज्जैन कर त्याचप्रमाणे श्री रामचंद्र गुरव आणि फाउंडेशनचे पुणे जिह्ला उपाध्यक्ष श्री जगन्नाथ बुडूखले गुरुजी आदींनी सुप्रसिद्ध साहित्यिका तथा सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड यांच्या मातोश्री डॉ.विजयाताई वाड यांच्या जोगेश्वरी येथील निवासस्थानी जाऊन त्यांचा सुद्धा आदिशक्ती संत मुक्ताई ची प्रतिमा, आळंदी संमेलनाचा विशेषांक भेट देऊन त्यांचा सत्कार केला याप्रसंगी डॉ. विजयाताई वाड यांनी सर्वांनाच त्यांचे स्व लिखित पुस्तक सप्रेम भेट दिले याप्रसंगी सुद्धा डॉ. विजयाताई वाड यांनी शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या अखंड कार्याचे तोंड भरून कौतुक केले व शुभेच्छाही दिल्यात.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १८ मे २०२५
https://lokaarambh.com

नेत्र तपासणी शिबिरात 198 नागरिकांची तपासणी

तालुका अंबड येथे उपक्रम राबवला

तालुक्यातील वाळका (ता. अंबड, जि. जालना) येथे बीडी किराणा दुकान व ग्रामस्थांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल १९८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. ग्रामपंचायत वाळका सरपंच सौ. सुलोचना गणेश सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्रीराम मंदिर सभागृहात संपन्न झालेल्या या शिबिरात डॉ. अविनाश बडगुजर व डॉ. गणेश सोनवणे यांच्या पथकाने तपासणी केली. यावेळी गरजूंना मोफत चष्मे वाटप व शस्त्रक्रियेसाठी निवडही करण्यात आली. या उपक्रमात बीड लाईन हॉस्पिटल जालना यांच्या नेत्रतज्ञ सेवांचा लाभ घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा. अँड. शंकरराव सोनवणे (माजी सभापती) यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संयोजन संजय सोनवणे यांनी केले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी नवनाथ सोनवणे, गणेश सोनवणे, पांडुरंग वाजरे, विक्रम सोनवणे, प्रवीण बुर्जे, विजय सोनवणे, किरण सोनवणे आदींनी मेहनत घेतली. गावकऱ्यांनी या आरोग्य उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले.

मानोरा ते दिग्रस मार्गावर उद्या ट्री कटिंग; सकाळी ७ ते दुपारी १ पर्यंत वीजपुरवठा बंद

मानोरा प्रतिनिधी) दि. 18 मे 2025, रविवार रोजी मानोरा ते दिग्रस विज मार्गावरील तारांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांच्या फांद्या हटविण्याचा (ट्री कटिंग) कार्यक्रम महावितरण (MSEB) तर्फे हाती घेण्यात आला आहे. या कारणामुळे मानोरा शहर तसेच परिसरातील गावांचा वीजपुरवठा सकाळी 7:00 ते दुपारी 1:00 वाजेपर्यंत बंद राहणार आहे. महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, विजेच्या तारांमध्ये अडथळा ठरणाऱ्या फांद्या कापण्याचे नियोजन असून, सुरक्षितता आणि अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी ही कारवाई आवश्यक आहे. सर्व वीज ग्राहकांनी वीजपुरवठा खंडित राहणार असल्याची नोंद घ्यावी, आणि आवश्यक त्या कामांची पूर्वतयारी करून घ्यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

लाडक्या बहिणीचे पैसे देतो कोण? दाढीवाल्या बाबाचे नाव घेत गुलाबराव पाटलांचा मोठा दावा

लाडकी बहीण योजनेचे कवित्व आणि वाद अजून संपलेला नाही. मत पुरते भाऊरायाचे प्रेम होते, आता विविध निकष लावून बहिणींना योजनेतून खड्या सारखे बाजूला करण्यात येत असल्याचा आरोप विरोध करत आहेत. तर दुसरीकडे महायुतीमधील नेत्यांचे या योजनेवरून सुरू असलेली श्रेय वादाची लढाई संपलेली नाही. मंत्री गुलाबराव पाटील यांच्या वक्तव्याने श्रेयवादीची लढाई संपली नसल्याचे दिसून येत आहे. दाढीवाला बाबा देतो पैसे लाडकी बहीण योजनेचे पैसे एकनाथ शिंदे यांनी सुरू केले, असे सभासद नोंदणी करताना महिलांना सांगा, असं वक्तव्य गुलाबराव पाटील यांनी केले आहे. आपला दाढीवाला बाबा म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे लाडक्या बहिणींना 1500 रुपये देतात असा गुलाबराव पाटील यांचा दावा आहे. जळगावमधील मेळाव्यात त्यांनी या योजनेचे श्रेय शिवसेनेचे, एकनाथ शिंदे यांचे असल्याचा एक प्रकारे दावा केला आहे. पुरुषांपेक्षा महिलांनी ठरवलं तर महिला आघाडीची नोंदणी पुरुषांपेक्षा जास्त होऊ शकते. सभासद नोंदणी करताना एवढेच सांगा की ज्यांनी लाडक्या बहिणीचे पैसे चालू केले त्या एकनाथ शिंदे त्यांचा हा पक्ष आहे, असा सल्ला द्यायला सुद्धा मंत्री गुलाबराव पाटील विसरले नाहीत. पक्ष सदस्य वाढवण्याचा हा मंत्र कार्यकर्त्यांना लागू होईल अशी आशा त्यांना आहे. जळगावच्या मेळाव्यात मंत्री गुलाबराव पाटील यांनी उपस्थित कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना त्यांनी सभासद नोंदणीचे आवाहन केले. बायकोने हात लावला तरी नमस्कार इंग्रजांच्या काळात जसं एक अफवा पसरवणारा खात होतं तसेच अफवा निवडणुकीत लोकांनी पसरवल्या. विधानसभा निवडणुकीच्या वेळेस लोकांनी मी निवडून येणार नाही अशा अफवा पसरवली होती. गुलाबराव पाटलांचा काही खरं नाही... मराठा बौद्ध मुस्लिम समाज मला मतदान करणार नाही अशा अफवा पसरवण्यात आल्या होत्या, असे पाटील म्हणाले. यामुळे मला सुद्धा रात्र रात्रभर झोप लागायची नाही. बायकोने जरी हात लावला तरी मी उठून तिला नमस्कार करायचं की लक्ष ठेवजो, असा किस्सा पाटलांनी सांगताच एकच हाश्या पिकला. निवडून आल्यानंतर लोकांनी प्रचार केला की निवडणुकीत गुलाबराव पाटलांनी अमाप पैसा चालवला.

२५ हजार अतिरिक्त गुरुजींना दिलासा - उच्च न्यायालयाचा निर्णय शिक्षण क्षेत्रासाठी दिलासादायक

प्रतिनिधी, परतवाडा राज्यातील जिह्ला परिषद शाळांमधील नवीन संच मान्यतेमुळे नोकरी गमावण्याच्या मार्गावर असलेल्या २५ हजार अतिरिक्त गुरुजींना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नवीन संच मान्यतेवर स्थगिती दिली असून, त्यामुळे या शिक्षकांचे भवितव्य सध्या तरी सुरक्षित झाले आहे. राज्य शासनाने १५ मार्च २०२४ रोजी नवीन अध्यादेश काढून शाळांच्या संच मान्यतेत बदल करताच, त्याचा मोठा परिणाम शिक्षकांवर झाला होता. नवीन संच मान्यतेनुसार सुमारे २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार होते. या निर्णयाच्या विरोधात प्रहार शिक्षक संघटनेने जोरदार आंदोलन व कायदेशीर लढा उभारला होता. या लढ्याला यश मिळाले असून, न्यायालयाने शासनाच्या निर्णयावर तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. संच मान्यता, ग्रामीण शिक्षण मोडीत काढण्याचे धोरण हे शिक्षक विरोधी असल्याची टीका प्रहार शिक्षक संघटनेने केली आहे. आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील या संघटनेच्या पाठपुराव्यामुळेच शासनदरबारी निर्णयात बदल झाला असल्याचे स्पष्ट झाले. हा निर्णय शिक्षण क्षेत्रातील अस्थिरतेला आळा घालणारा असून, शिक्षकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरतो, असे मत संघटनेने व्यक्त केले.

सोनल कॉलनी मधील चोरी गेलेला रस्ता अमरावती

महानगर पालिकाच्या मालमता विभागाने शोधला

प्रतिनिधी अमरावती महानगर पालिकेच्या मालमता विभागाने आखिर काळ संगीत नगर व सोनल कॉलनी मधील लांडगे लेआउट मधील चोरी गेलेला १५ फुटाचा रस्ता आखिर अतिक्रमण करण्यालाना शोधुण महानगर पालिका अमरावती यानी दोन लेआउट चा नकाशा एकमेकाला जोडुण नविन नकाशा तयार केला व कशा प्रकार लोकानी जागेवर अतिक्रमण केले यांच्या रिपोर्ट तयार करुण झोन क्र 1 चे अभियता आशिष अवत्तरे साहेब यांच्या कडे पुढील कार्यवाई करता पाठवले आहे आता पाहायचे आहे येण्यार्या जुन महिण्याचा पहिल्या सोमवारी महानगर पालिकेच्या लोकशाही दिवसशी सोनल कॉलनी मधील रहिवासी याना खरच न्याय भेटते का?

मठपिंपळगाव येथील दुधना खोलीकरणास प्रारंभ.

/प्रतिनिधी

शनिवार दि. 17 रोजी सकाळी मौजे मठपिंपळगाव येथील शेतकऱ्यांच्या पुढाकाराने समस्त महाजन ट्रस्ट ,मुंबई यांच्याकडुन मिळालेल्या पोकलेन्ड मशीन चे पूजन करुन खोलीकरणास सुरवात करण्यात आली आहे.

दुधना नदीखोलीकरणामुळे अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव, जालना तालुक्यातील गोलापांगरी (गणेशनगर), बदनापूर तालुक्यातील घोटण या गावांना फायदा होणार आहे.

यासाठी देवानंद चित्राल हे परिश्रम घेत आहेत .

यावेळी प्रा विवेक पाटील, दत्तात्रय मोरे (डी.के.मोरे आण्णा) ,

बाबा मोरे, तेजराव जिगे, लक्ष्मणराव जिगे, कृषी सहायक पांडुरंग देठे, कैलासराव जिगे, कृष्णा जिगे, सुरेश जिगे, नंदकुमार जिगे, कैलास जिगे, रघुनाथ जिगे, बाबासाहेब जिगे, जनार्दन जिगे, सुभाष जिगे, अंकुश जिगे, योगेश जिगे,धीरज जिगे ,काकासाहेब जिगे, देविदास जिगे, विकास खेकडे, गणेश जिगे, ऑपरेटर रामराव कातकडे, परमेश कुमार, संजीत कुमार आदींची उपस्थिती होती.

अटॅक येऊन मरुन जाईल, नाही तर आत्महत्या करावी लागेल, बडा नेता मातोश्रीत रडला; राऊतांच्या पुस्तकात काय?

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तकाने राजकीय वादळ निर्माण केलं आहे. या पुस्तकात ईडीच्या कारवाया, सरकारचा धाकदपटशा, ईडी, सीबीआयच्या नोटिसांमुळे विरोधी पक्षातील आमदार आणि खासदारांचं गळालेलं आवसान आणि त्यानंतर झालेले पक्षांतर यावर भाष्य करण्यात आलं आहे. तसेच कोठडीतील अनुभवावरही या पुस्तकात लिहिलं गेलं आहे. ईडीची नोटीस आल्याने अटकेच्या भीतीने ठाकरे गटाचा एक नेता कसा हतबल झाला होता,

मातोश्रीत तो कसा रडला होता आणि त्यामुळे उद्धव ठाकरेही कसे हतबल झाले होते याचा प्रसंग या पुस्तकात लिहिण्यात आला आहे. ईडीची प्रतिमा तपास यंत्रणेपेक्षा भाजपच चालवत असलेली दहशतवादी संघटना अशीच झाली होती. त्यामुळे अनेकांनी घाबरून भाजपमध्ये उड्या मारल्या होत्या. रवींद्र वायकर हे शिवसेनेच्या निष्ठावान समजल्या जाणाऱ्या आमदारांपैकी एक होते. उद्धव ठाकरे यांच्या किचन कॅबिनेटचे ते एक सदस्य होते. त्यांचा मातोश्रीवर राबता असे. एकनाथ शिंदे यांनी चाळीस आमदारांसह पक्ष सोडला तेव्हा ते शिंदेंसोबत गेले नाहीत.

केळठण (वज्रेश्वरी) येथील निवासी बाल संस्कार शिबिराची सांगता

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी संत श्री ज्ञानोबा तुकोबा सत्संग सेवा संस्था, आळंदी सारशी (वाडा) यांच्या माध्यमातून हभप राजेश महाराज बांगर यांच्या पुढाकाराने केलठण (वज्रेश्वरी) येथील सरस्वती गणपत पाटील विद्यालय येथे भव्य निवासी बाल संस्कार शिबीराचे आयोजन दिनांक ४ मे ते १५ मे २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. गुरुवार दिनांक १५ मे २०२५ रोजी सायंकाळी हभप रमाकांत महाराज शास्त्री यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. सलग ५व्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या ह्या शिबिराचा सांगता समारंभ शुक्रवार दिनांक १६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. यावेळी केळठण व परिसरातील ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थीत होती. यावेळी व्यासपीठावर हभप प्रतिभाताई पाटील, हभप यशवंत पाटील, हभप संतोश महाराज देसले, हभप साळुंखे महाराज, हभप रामचंद्र बाबा नाईक (श्रीनित्यानंद बाबांचे मानसपुत्र), हभप रामचंद्र बाबा पाटील, श्री कमलाकर पाटील सर, हभप नारायण बाबा पाटील, महेश बांगर, संजय बांगर, सरस्वती गणपत पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय पाटील सर, लेखक व जॉय संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते वैभव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आजच्या मोबाईलच्या युगात संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी बाल संस्कारांची नितांत गरज असुन त्यासाठी पालकांचे योगदान व इच्छाशक्ती फार महत्वाची असल्याचे हभप राजेश म बांगर यांनी सांगीतले. कलियुगाच्या भयानक वातावरणामध्ये लहान मुले संस्कारहीन बनत चालली आहे. अशा वातावरणामध्ये तरुण पिढी आई-वडिलांना मानायला तयार नाही, म्हणून बाल मनावर चांगल्या संस्काराची जडण घडण होण्यासाठी संत अध्यात्मिक चिंतनाची आणि सहवासाची अत्यंत गरज आहे व हा हेतू अंतकरणामध्ये ठेवून गेल्या ४ वर्षापासून बाल संस्कार निवासी शिबिराचे आयोजन करत असल्याचे हभप बांगर महाराज यांनी सांगितले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना योगासने, भगवद्गीता, विष्णुसहस्त्रनाम, गायन, वारकरी गायन, मृदंग वादन, हरिपाठ आदी शिक्षण देण्यात आले. हभप राजेश म बांगर यांच्या ह्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही याप्रसंगी सर्वच ग्रामस्थ मान्यवरांनी दिली. बाल संस्कार शिबीर भरवणे सहज सोपे नसून त्यासाठी मोठा संघर्ष व त्याग करावा लागतो असे मत वैभव पाटील यांनी व्यक्त करत त्यांचे महत्व लक्षात घेता अशा प्रकारची शिबिरे गावोगावी आयोजित करणे अत्यावश्यक झाल्याचेदेखील त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थी हा वाचनप्रिय असावा असे सांगत विद्यार्थ्याने पुस्तकी धड्यांव्यतिरिक्त अवांतर वाचनावर लक्ष केंद्रित करून शब्दसाठा व बाहेरील जगाचे ज्ञान आत्मसात करावे असेही पाटील यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी हभप राजेश महाराज बांगर, हभप काशीनाथ महाराज पटारे, हभप सुधाकर महाराज अवचार, हभप साळुंखे महाराज इत्यादी आयोजकांनी अथक परिश्रम घेतले.

हे सरकारही उद्या जाणार, हा स्वर्गासारखा देश: उद्धव ठाकरे कडाडले!

खासदार संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तका मुंबईतील प्रकाशन सोहळ्यात उद्धव ठाकरे यांनी तुफाणी भाषण केलं. आपल्या खास शैलीत त्यांनी सत्ताधारी महायुतीवर जोरदार फटके बाजी केली. विशेष म्हणजे राऊतांच्या पुस्तकाचा संदर्भ देत त्यांनी सध्याचं राज्यातलं सरकार उद्या जाणारच आहे, असं ठणकावून सांगितलं. उद्धव ठाकरे काय म्हणाले? आपण असंख्य लढाया लढलो आहोत. यापुढेही लढायाच्या आहेत. संजयचं पुस्तक वाचून लोकांच्या मनातील तुरुंगाची भीती निघून जाईल. या पुस्तकातील घुशी आणि सशांचे उल्लेख वाचून आपल्याला बरं वाटतं. पण तुरुंगात यातना भोगताना काय वाटलं असेल? संजय तू या पुस्तकाने लोकांना प्रेरणा देण्याचं काम केलं आहे,



अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी राऊतांचे कौतुक केले. ... हेही सरकार उद्या जाणार- उद्धव ठाकरे तसेच, सरकारं येतात आणि जातात. हे सरकारही उद्या जाणार आहे. किंबहूना आपल्याला ते घालावावच लागेल, अशी गर्जनाच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. कुणाला काय व्हायचं म्हणून नाही तर यांनी हा स्वर्गासारखा देश नरक केला. त्यासाठी या लोकांना घालवण्यासाठी आपल्याला लढावंच लागेल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. पंतप्रधानांचं विमान जातं म्हणून इतरांची विमाने... उद्धव ठाकरे यांनी देशातील हुकूमशाही कारभारावर जोरदार आसूड ओढले. आता वन नेशन, वन इलेक्शनचं सुरू आहे. असं असेल तर सर्वांना समान पातळीवर आणा. पंतप्रधान हा देशाचा असतो. त्यांनीही पंतप्रधान म्हणून कोण्या एका पक्षाचा प्रचार करू नये. एकाच पक्षाच्या प्रचाराची गरज नाही. निवडणुकीच्या काळात पंतप्रधानांचं विमान जातं म्हणून इतरांची विमाने उडू दिली नाहीत. पंतप्रधानांच्या सभा चालतात. मग इतरांच्या झाल्या नाही तरी चालतील. हे असं कसं? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. आम्हाला दुश्मन का समजता? अमित शाह आम्हाला कशासाठी दुश्मन समजता? तुमचे आणि आमचे मतभेद आहेत. तुमचं बुरसटेललं हिंदुत्व आहे. आमचं राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व आहे. तुम्ही आम्हाला पाकिस्तानपेक्षा आधी खत्म करायचं बघत आहात का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. तरीही शिवसेना सत्तेत आली तुम्ही शिवसेनेला संपवायला निघाला. हा पहिला प्रसंग नाही. 1969 साली शिवसेनाप्रमुखांनाही तुरुंगात ठेवलं होतं. 100 दिवस शिवसेना प्रमुख तुरुंगात होते. मोरारजी देसाई तेव्हा उपपंतप्रधान होते. माहीम चर्चजवळून मोरारजी देसाई यांचा ताफा जाईल आणि त्यांना शिवसेना निवेदन देईल असं ठरलं होतं. मला आठवतंय. आमच्याकडे अम्बेसेडर कार होती. त्यात मी आणि माँ होतो. पण मोरारजींचा तोफा वेगात आला. त्यांनी अनेकांना उडवलं. त्यामुळे आंदोलन चिघळलं. तुफान राडा झाला. शिवसेनाप्रमुखांनी माँला सांगितलं बॅग भरून ठेवा. रात्री आम्हाला तुरुंगात ठेवतील. त्यानंतर पहाटे शिवसेनाप्रमुखांना अटक झाली. तीन महिने शिवसेनाप्रमुख आत होते. शिवसेना तीन महिने नेतृत्वहीन झाली होती. तरीही शिवसेना नंतर सत्तेत आली, असं उद्धव ठाकरे म्हणाले

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १८ मे २०२५
https://lokaarambh.com

हा तर ट्रेलर, पिक्चर अजून बाकी; युद्धविराम तुटणार? पाकिस्तानला का भरली धडकी

पाकच्या गयावयानंतर 10 मे रोजी भारताने पण युद्ध विरामाला संमती दिली. पण गेल्या 24 तासात पाकिस्तानमधील बडे नेते आणि खासदारांचे वक्तव्य काही वेगळाच संकेत देत आहेत. भारत, पाकमध्ये घुसून पुन्हा दहशतवाद्यांवर कारवाईची भीती त्यांना सतावत आहे. मग्रुर बिलावल भुट्टो असो वा युद्धाच्या वल्गना करणारे इतर पाकडे असतील. आता सर्वांना भारत पुन्हा स्ट्राईक करण्याची भीती वाटत आहे. तर काल भुजमध्ये बोलताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी हा ट्रेलर होता, पिक्चर अजून बाकी आहे, असा थेट संदेश दिला. त्यामुळे युद्ध विराम तुटण्याची शक्यता असल्याचा दावा करण्यात येत आहे. 18 मे ची पाकिस्तानला का भीती वाटत आहे, काय होणार उद्या? या घडामोडी काय सांगतात? युद्ध विराम झाल्याच्या 5 दिवसानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घुमजाव केले. आपण मध्यस्थी केली नसल्याचे सांगितले. तर दुसरीकडे पाक विजयी झाल्याचा खोटा ढोल बडवणारे शरीफ वठणीवर आले. भारताने घुसून हल्ला केल्याची जाहीर कबुली त्यांनी दिली. भारताशी चर्चेची तयार सुरू केली. तर पाकचे खासदार पुन्हा भारत हल्ला करण्याची शक्यता वर्तवत आहेत. दुसरीकडे राजनाथ सिंह यांच्या वक्तव्याने चर्चेला पेव फुटले आहे. या घटना काही तरी मोठ्या घडामोडी घडत असल्याचे इंगित करत आहेत. 18 मे रोजी काय मोठे घडणार?

18 मे रोजी काही मोठे घडणार आहे का? ऑपरेशन सिंदूरची स्पष्ट भीती आतापर्यंत गुरगुरणाऱ्या पाकच्या दहशतवाद्यांच्या थोबाडावर दिसून येत आहे. ते हादरले आहेत. भारत आपल्याला कधी नरकात पाठवेल याची स्पष्ट भीती त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे. पाकिस्तानी खासदारांनी तर 18 मे रोजी मोठे काही तरी घडणार असे दावे सुरू केले आहेत. ऑपरेशन सिंदूरचा पार्ट -2 सुरू होणार असल्याची भीती त्यांना सतावत आहे. पाकिस्तानचे खासदार सय्यद शिबली फराज याने तर भारत आता शांत बसणार नाही, त्याला डिवचू नका. आपल्याला अधिक सतर्क राहावे लागेल असे विधान केले आहे.

आज DGMO ची बैठक

आज 18 मे रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध विरामावर दोन्ही देशांच्या DGMO ची बैठक होत आहे. हा बैठकीचा चौथा टप्पा आहे. पण त्यापूर्वी ज्या काही घडामोडी घडल्या आहेत. त्यामुळे काही तरी मोठे घडणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही अभ्यासकांनी सुद्धा हा युद्ध विराम नाही तर युद्ध अल्पविराम असल्याचा दावा केला होता. आता काही दिवसात काय घडते यावरून चित्र स्पष्ट होईल.

हो, भारताने घुसून मारले, शहाबाज शरीफ यांची मोठी कबुली

भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर तणाव वाढला. 6 आणि 7 मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले. पाकिस्तान घुसून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. पाकने भारताविरोधात ड्रोन आणि मिसाईलने हल्ले केले. त्याला जोरदार प्रत्युतर देण्यात आले. पाकिस्तानातील 13 मधील 11 एअरबेसवर निशाणा साधण्यात आला. स्वत:ला दहशतवाद आणि अणवस्त्रांचा 'चौधरी' समजणाऱ्या पाकड्यांचे भारताने कंबरडे मोडले. या हल्ल्याच्या 8 दिवसानंतर पाकिस्तान पंतप्रधान यांनी भारताने हे एअरबेस नष्ट केल्याचे मान्य केले.

मुनीर यानेच दिली पंतप्रधानांना माहिती

भारताला वारंवार ललकारणारा लष्कर प्रमुख सय्यद असीम मुनीर याला या कारवाईत माती खावी लागली. शाहबाज शरीफ यांनी या हल्ल्याची माहिती दिली. त्यानुसार 9-10 मे रात्री जवळपास 2:30 वाजता जनरल सय्यद असीम मुनीर याने त्यांना कॉल केला. भारतीय बॅलेस्टिक मिसाईल नूर खान एअरबेस आणि काही इतर भागावर डागण्यात आले आणि त्यात मोठे नुकसान झाल्याचे सांगितले. एअरबेस वाचवण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याची माहिती मुनीर याने दिल्याची माहिती शरीफ यांनी दिली. भारताच्या हल्ल्यात पाकिस्तानचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचा दावा पाकडे करत होते. पण भारताने नुकसानीचे छायाचित्र जगासमोर मांडली होती. यानंतर पाकिस्तान आणि मुनीर हे सातत्याने त्याचे खंडन करत होते. पण अखेर त्यांनी भारताने घुसून हल्ले केल्याचे त्यात जीवित हानी झाली आणि हवाईतळांचे मोठे नुकसान झाले.

भारताच्या दाव्याला दुजोरा भारत आणि पाकिस्तान तणावानंतर 10 मे रोजी पाकिस्तानकडून गयावया करण्यात आल्या आणि त्यानंतर युद्ध विरामावर सहमती झाला. त्यापूर्वी भारताने एअरबेसवर निशाणा साधला. या हल्ल्यात पाकिस्तानचे नूर खान एअरबेस पूर्णपणे नष्ट झाले. हा दावा भारताने त्याच दिवशी केला होता. हा हल्ला झाल्यानंतर पाकिस्तान हादरून गेला. चीन आणि तुर्कस्तानकडून येणाऱ्या शस्त्रांचा वापर करत याच विमानतळावरून भारताविरोधात मोठे ऑपरेशन राबवण्याचे मुनीरचे स्वप्न आपल्या लष्कराने धुळीस मिळवले. आता शरीफ याने भारताच्या दाव्याला दुजोरा दिला आहे.

सिन्नर येथे भव्य बुद्ध विहाराचे 1 जूनला उद्घाटन

नाशिक, १६ मे २०२५: नाशिकच्या सिन्नर येथे धम्मप्रेम आणि त्यागाची एक प्रेरणादायी कथा साकार होत आहे. आदर्श शिक्षक माधव जगताप यांनी आपल्या मुलीच्या स्वप्नाला साकार करण्यासाठी स्वतःची जमीन बुद्ध विहारासाठी दान केली. येत्या १ जून २०२५ रोजी या भव्य बुद्ध विहाराचे उद्घाटन होणार असून, हा सोहळा धम्मप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरणार आहे. माधव सरांची मुलगी प्रज्ञा हिचे दुर्मिळ आजाराने निधन झाले, पण तिच्या मनात गावात बुद्ध विहार उभारण्याचे स्वप्न होते. या इच्छेला पूर्ण करण्यासाठी माधव सरांनी आपला त्याग आणि श्रद्धा दाखवली. या कार्यात धम्मप्रेमी उद्योजक संदीप मोरे यांनी पंचधातूची ४ फूट उंच बुद्ध मूर्ती दान करून महत्त्वपूर्ण योगदान दिले, ज्यामुळे हे विहार अधिक भव्य स्वरूपात साकारले गेले. गावकऱ्यांचे सहकार्य आणि धम्माप्रती निष्ठा यामुळे हे कार्य यशस्वी झाले आहे. "बुद्धं शरणं गच्छामि" या मंत्राने प्रेरित होऊन सर्वांना १ जूनच्या उद्घाटन सोहळ्यात सहभागी होण्याचे आणि यथाशक्ती योगदान देण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी स्थानिक आयोजकांशी संपर्क साधावा. नमो बुद्धाय | जय भीम

वडाळा येथील शिवसृष्टी सोसायटीची समस्या म्हाडाने तातडीने सोडवावी !

वडाळा येथील शिवसृष्टी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांना भेडसावणाऱ्या समस्या म्हाडाने तातडीने कारवाई करावी, तसेच येथील गुन्हेगारी प्रवृत्तीवर कारवाईसाठी पोलिस विभागास सुचनाही द्यावेत, अशा सूचना गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिल्या आहेत. शिवसृष्टी गृहनिर्माण संस्थेच्या प्रश्नाबाबत मंत्रालयात, नुकतीच पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यावेळी राज्यमंत्री भोयर बोलत होते. या गृहनिर्माण संस्थेला लागून असलेल्या झोपडपट्टी वासियांना येण्या-जाण्यासाठी असलेल्या पर्यायी मार्ग काढावा. असे सांगून राज्यमंत्री भोयर म्हणाले की, ह्या संस्थेस पक्के उंच मजबूत कंपाऊंड बांधणे, मेन गेट बसवणे या कामाविषयी लवकरात लवकर कार्यवाही करावी.

सोलापुरमधील अक्कलकोट रोड एमआयडीसीतील कारखान्याला भीषण आग, ३ जणांचा मृत्यू

सोलापुर शहरातील अक्कलकोट एमआयडीसी परिसरातील एका कारखान्याला भीषण आग लागली आहे. सोलापूरमधील सेंट्रल इंडस्ट्री या कारखान्याला मध्यरात्री 3 च्या सुमारास आग लागली आणि पाहता पाहता या आगीने अतिशय रौद्ररूप धारण केलं आहे. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अेक गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी 3 जणांना कारखान्यातून बाहेर काढलं आहे. या आगीत तिघांना आपला जीव गमवावा लागल्याची माहिती समोर येत आहे. मात्र अद्यापही पाच ते सहा जण आग लागलेल्या या कारखान्याच्या आतच अडकून पडल्याची भीती व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आगीतून बाहेर काढलेल्या तिघांची अवस्था अजून

गंभीर असून त्यांना उपचारांसाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आग लागून चार तास उलटून गेल्यानंतरही ही आग विझलेली नाही. कारखान्यात आणखी पाच ते सहा कामगार अडकून पडले आहेत. दरम्यान या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाची मोठी टीम पोहोचली असून पोलिसांचाही मोठा बंदोबस्त तैनात आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी, ती विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान शर्थीचे प्रयत्न करत आहेत. दरम्यान आग लागलेल्या या कारखान्यात टॉवेल तयार केले जायचे. त्या साहित्यामुळे आग आणखीनच पसरत गेल्याचे समजते. ही आग इतकी भीषण होती की, मध्यरात्री संपूर्ण परिसर आगीच्या ज्वालांनी वेढला गेला होता. अगदी दूरवरूनही आगीच्या ज्वाळा स्पष्टपणे दिसत होत्या.

कोविडच्या नव्या लाटेचे संकेत ! आशियातील या देशांमध्ये कोविड-१९ ने हाहाकार माजवला

जगातून कोरोनाचे उच्चाटन झाले आहे का? जगभरात हाहाकार माजवणारा कोविड-19 संपला, असं तुम्हाला वाटत असेल तर ती तुमची चूक आहे. होय, पुन्हा एकदा कोरोना जगात हळूहळू पसरत आहे. हाँगकाँगपासून सिंगापूरपर्यंत कोरोनाचे नवे रुग्ण सापडले आहेत. होय, कोव्हिड -19 ची प्रकरणे सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे आरोग्य अधिकारी चिंतेत पडले आहेत. कोव्हिड-19 च्या प्रकरणांमध्ये पुन्हा वाढ झाल्याने संपूर्ण आशियात कोविडच्या नव्या लाटेचे संकेत मिळाले आहेत. वास्तविक, हाँगकाँगमधील कोरोना आता आपला खरा रंग दाखवत आहे. कोरोना व्हायरसच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. सेंटर फॉर हेल्थ प्रोटेक्शनमधील संसर्गजन्य रोग शाखेचे प्रमुख अल्बर्ट ऑ म्हणतात की, कोरोना व्हायरसची सक्रियता आता खूप उच्च पातळीवर पोहोचली आहे. कोविड-19 पॉझिटिव्ह नमुन्यांची टक्केवारी वर्षभरातील उच्चांकी पातळीवर पोहोचली आहे. म्हणजेच कोरोनाची प्रकरणं तर येत आहेतच, शिवाय मृत्यूही होत आहेत. हाँगकाँगमध्ये कोविड प्रकरणे हाँगकाँगमध्ये कोरोना व्हायरसची प्रकरणे आणि मृत्यू जवळपास वर्षभरातील उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. 3 मे च्या आठवड्याच्या शेवटी हाँगकाँगमध्ये कोरोनाव्हायरसमुळे 31 जणांचा मृत्यू झाला होता. मात्र, दिलासादायक बाब म्हणजे गेल्या दोन वर्षांतील कोरोनाचा संसर्ग अद्याप शिगेला पोहोचलेला नाही. कोव्हिडसंबंधित रुग्णांसाठी डॉक्टरांकडे जाऊन रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. 70 लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या या शहरात कोरोनाचा संसर्ग पसरत असल्याचे यावरून दिसून येत आहे. कोरोनाने पुन्हा एकदा सर्वसामान्यांपासून ते विशेषांपर्यंत सर्वांना वेठीस धरायला सुरुवात केली आहे. हाँगकाँगचे गायक आयसन चॅन यांना कोविड-19 ची लागण झाली आहे. कॉन्सर्टच्या अधिकृत वीबो अकाऊंटवरील पोस्टनुसार, तैवानमधील काओशुंग येथे या आठवड्यात होणारी त्यांची कॉन्सर्ट रद्द करण्यात आली आहे. सिंगापूरमध्येही कोरोनासंदर्भात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. या महिन्यात आरोग्य मंत्रालयाने जवळपास वर्षभरात प्रथमच संसर्गाच्या आकडेवारीचे अपडेट जारी केले. 3 मे रोजी संपलेल्या वीकेंडमध्ये अंदाजित प्रकरणांमध्ये 28 टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर आले आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात कोरोनाचे 14,200 नवे रुग्ण आढळले आहेत. सिंगापूरमध्ये कोविडच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असली तरी आरोग्य मंत्रालयाचे म्हणणे आहे

की, जे नवीन व्हेरिएंट पसरत आहेत ते अधिक संसर्गजन्य आहेत किंवा पूर्वीपेक्षा अधिक गंभीर आजारास कारणीभूत आहेत असे अद्याप कोणतेही संकेत नाहीत. कोरोनाच्या वाढत्या प्रकरणांमुळे चिंता का वाढली? हिवाळ्यात श्वसनाचे विषाणू सहसा अधिक सक्रिय असतात. पण यंदा उन्हाळा सुरू होताच कोरोनाचे रुग्ण वाढू लागले आहेत. उन्हाळ्यातही कोरोना व्हायरस वेगाने पसरू शकतो आणि मोठ्या संख्येने लोक आजारी पडू शकतात, हे स्पष्ट झाले आहे. आशियातील इतर देशांचे काय? चायनीज सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शनच्या आकडेवारीनुसार चीनमध्येही कोरोनाने डोके वर काढायला सुरुवात केली आहे. गेल्या वर्षी उन्हाळ्याच्या शिखरावर पोहोचलेल्या कोविड-19 लाटेचा ही चीनला अनुभव येणार आहे. चीनच्या रुग्णालयांमध्ये आता कोविड पॉझिटिव्हचे रुग्ण सापडत आहेत. तर थायलंडच्या रोग नियंत्रण विभागानेही कोरोनाच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याची माहिती दिली आहे. दिलासादायक बाब म्हणजे भारतात सध्या कोरोनाचे रुग्ण दिसत नाहीत. त्यामुळे आत्ता च इथे घाबरण्याची गरज नाही.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com